दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–५२ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २४ जुलै २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

लहान मोठ्या विकासकांकडून सुमारे पाच हजार ग्राहकांची फसवणूक?

शेकडो कोटी गुंतवले पण १० वर्षांत मिळाले नाही घर

STOP CHEATING US
GIVE US OUR HOME
हक्काचे घर मिळालेच पाहिजे
HOMELESS
कोणी घर देता का घर

नागरिकांची सुमारे ३०० कोटींची फसवणूक

आमदार संजय केळकर यांचा विकासकाविरुद्ध एल्गार

ठाणे: तत्वज्ञान विद्यापीठ परिसरात एका विकासकाने शेकडो नागरिकांकडून सुमारे ३०० कोटी घेऊन गेल्या १० वर्षांत एक विटही रचली नसल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत. आमदार संजय केळकर यांनी दणका देताच विकासकाने ऑगस्टपासून बांधकाम सुरू करण्याचे वचन दिले आहे. तर घरे मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही अशी आक्रमक भूमिकाही आमदार केळकर यांनी घेतली आहे.

STOP CHEATING US
GIVE US OUR HOME
हक्काचे घर मिळालेच पाहिजे

राजेश पटेल असे विकासकाचे नाव असून त्याच्या विरोधात तब्बल १८ गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळते. या विकासकाने २०१३ साली घोडबंदर मार्गावर तत्वज्ञान विद्यापीठ परिसरात राज टॉवर उभारण्याची योजना पुढे आणून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतली. अनेकांनी निवृत्तीनंतर मिळालेली रक्कम तर काहींनी कर्ज काढुन आयुष्यभराची पुंजी घरासाठी गुंतवली. घरकुलाचे स्वप्न पूर्ण होईल या आशेने सुमारे ५०० जणांनी साधारण २५० ते ३०० कोटींची रक्कम या विकासकाला दिली. मात्र आजतागायत या विकासकाने इमारतीची एक विटही रचली नसल्याने गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत.

या नागरिकांनी अखेर आमदार संजय केळकर यांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली. केळकर यांनी जाब विचारताच विकासकाने १५ मे २०२१ रोजी काम सुरू करणार असल्याचा शब्द दिला. मात्र हा शब्दही फोल ठरल्याने शनिवारी आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली या नागरिकांनी रस्त्यावर उतरून विकासकाविरोधात टाहो फोडला. आंदोलनाचा धसका घेतलेल्या विकासकाने येत्या ४ ऑगस्टपासून बांधकामास सुरुवात करणार असल्याचा शब्द दिला. दरम्यान विकासकाची गय केली जाणार नसून जोपर्यंत ग्राहकांना हक्काचे घर मिळत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही अशी ग्वाही देत नागरिकांना आश्वस्त केले.

याबाबत आमदार संजय केळकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ठाणे शहरात विकासकांकडून सर्वसामान्य ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे प्रकार वाढीस लागल्याचे सांगितले. शहरात लहान मोठ्या विकासकांकडून सुमारे पाच हजार ग्राहकांची फसवणूक झाली असून त्यांच्या तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत. त्यांना हक्काचे घर मिळवून दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही केळकर यांनी दिला.

तानसा धरण परिसरातील गावांना सतर्कतेचा इशारा

ठाणे: ठाणे जिल्ह्यात असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा धरण परिसरात सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे तानसा धरण भरून वाहण्याची शक्यता आहे, त्यामुळे धरणाखालील व नदीच्या परिसरातील गावांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

तानसा धरण ओसंडून वाहण्याची पातळी १२८.६३ मीटर टीएसडी इतकी आहे. आज ही पातळी १२६.६०२ मीटर टीएसडी हुन जास्त झाली आहे. त्यामुळे लवकरच धरण ओसंडून वाहण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने तानसा धरणाखालील व नदीच्या परिसरातील ठाणे जिल्ह्यातील शहापूर, भिवंडी आणि पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

धरणातून विसर्ग होत असताना ग्रामस्थांनी काळजी घ्यावी. तसेच महसूल व पोलीस प्रशासनाने दक्ष राहावे, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

ठाण्यात पुन्हा बर्निंग कार

ठाणे: नाशिककडून मुंबईला सोमवारी सकाळी निघालेल्या धावत्या कारला आग लागल्याची घटना ताजी असताना, घोडबंदर रोडने वागळे इस्टेटकडे निघालेल्या धावत्या कारने घोडबंदर रोडवरील तत्त्वज्ञान विद्यापीठ सिग्नल समोर पेट घेतल्याची मंगळवारी सकाळी सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीची झळ रस्त्यावर पार्क केलेल्या अन्य एका कारला बसली आहे. एकीकडे पाऊस पडत असताना, त्या भर पावसात दुसऱ्याकडे धावत्या कारने पेट घेतल्याचे समोर येत आहे. अशाप्रकारे ठाण्यातील चोविस तासातील ही दुसरी घटना आहे. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. मात्र पेट घेतलेली कार जळून खाक झाली आहे.

नाल्यात अडकलेल्या श्वानाला जीवनदान

ठाणे: आंबेडकर रोड कडून केव्हील कडे वाहणाऱ्या नाल्यात अडकलेल्या श्वानाला ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी जीवनदान दिले आहे. अडकलेल्या श्वानाला गुरुवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सुखरूप बाहेर काढण्यात आले. अडकलेला श्वान नाल्यातून बाहेर येण्यासाठी प्रयत्न करत होता. पण, पाण्याच्या प्रवाहाने त्याला येता येत नव्हते. ठाण्यातील आंबेडकर रोड कडून केव्हीला कडे वाहणाऱ्या पोलीस लाईनच्या मागे असलेल्या नाल्यात एक श्वान अडकला आहे. गेली अर्धा तास तो बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहे. पण पाण्याच्या प्रवाहामुळे त्याला येत नसल्याने नाल्यातील एका चौथ्याऱ्यावर तो श्वान सुरक्षित अवस्थेत अडकून पडला आहे. अशी माहिती ठाणेकर असलेल्या दक्ष नागरिकाने ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला दिली.

MH.03
DV.6243
BREAK GLASS

मनोरुग्ण इसमाने घुसून केली बसची तोडफोड

__ठाणे:__ बस रोडलगत पार्क करून बसची साफसफाई करत असताना, बसच्या दुसऱ्या बाजूचा खुला असलेल्या दरवाजाने एक मनोरुग्ण व्यक्ती बसमध्ये घुसून बसच्या काचांची तोडफोड केल्याची घटना बुधवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पोखरण रोड नंबर २ या परिसरात घडली. त्या मनोरुग्ण व्यक्तीला बसमधून सुखरूप बाहेर काढून चितळसर-मानपाडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

बस चालक छोटेलाल थाटेर हा नेहमीच बसची साफसफाई करताना भिवंडी येथील ४० वर्षीय राजेश कुमार नामक व्यक्ती बसमध्ये शिरला आणि बसची तोडफोड केली. तो व्यक्ती मनोरुग्ण असल्याची बाब पुढे आले आहे. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी चितळसर-मानपाडा पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अग्निशमन दल या विभागांनी धाव घेतली

संपादक
सुहास खंडागळे
व्यवस्थापक
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
छायाचित्रकार/प्रतिनिधी
सुदेश सकपाळ
वितरण प्रतिनिधी
संतोष मदने
ऑफीस पत्ता :-
गाळा नं. ०६, आई
जीवदानी कॉम्प्लेक्स,
हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या
मागे,वारेकर शाळेजवळ,
गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी
कॉलनी रोड, दिवा (पूर्व),
ठाणे-४००६१२.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत फूड पॅकेटस, ब्लँकेटस, कंटेनरसह मदत साहित्याचा ओघ

अलिबाग :- इरशाळगडाच्या पायथ्याला डोंगरात वसलेल्या दुर्घटनाग्रस्त आदिवासी पाड्यावर बचाव व मदत कार्यासाठी शासन यंत्रणा संपूर्ण प्रयत्नशील असून येथे मदत कामासाठी कार्यरत प्रत्यक्ष मनुष्यबळासाठी व दुर्घटनेतील वाचलेल्या नागरिकांसाठी घटना स्थळावर तात्पुरते निवारे, अन्न, मदत साहित्य यांची तातडीने उपलब्धता केली जात आहे. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन रायगड जिल्ह्यातील उद्योग व संस्था पुढे आल्या आहेत. जिल्हा प्रशासनाच्यावतीने सुविधा निर्माण करण्यासाठी साहित्य घटनास्थळाकडे पाठविले.

यामध्ये मदत साहित्य व निवाऱ्यासाठी घटनास्थळाच्या बेसकॅम्पकडे २० द १० आकाराचे ४ कंटेनर, ४० द १० चे २ व इतर दोन कंटेनर पाठविण्यात येत आहेत. सदर कंटेनर उरण, जेएनपीटी, रत्नागिरी एमआयडीसी, जेएसडब्लू समूह येथून रवाना झाले आहे. चौक , खालापूर येथील तात्पुरती निवाराव्यवस्था केली.

दुर्घटनाग्रस्त भागात विद्युत पुरवठा होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत अभियंता, महावितरण यांचे पथक पाठविण्यात आले आहे. यासह यंत्रणेसाठी तात्पुरती निवारा व्यवस्था, अन्न व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा यादृष्टीने महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता व त्यांची यंत्रणा काम करत आहे. तेथे साहित्य सामुग्री व अति महत्वाच्या व्यक्तींच्या समन्वयन, हेलिपॅड आदी सुविधा तयार केल्य. जिल्हा शल्य चिकित्सक अलिबाग यांचे कडून जखमींवर उपचारासाठी सुविधा देण्यात आली. विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील मदत कार्यावर लक्ष ठेवून आहेत. स्वत: विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ. म्हसे दुर्घटनेची माहिती समजल्यानंतर रात्री दीड वाजता घटना स्थळी प्रत्यक्षात पोहोचले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, खालापूर तहसिलदार अयुब तांबोळी यांनी रात्री परिस्थितीचा अंदाज घेत, बचावकार्यासाठी आवश्यक साधन सामग्री, मनुष्यबळ करावयाच्या उपाययोजना यांची तयारी केली.

महसूल, जिल्हा परिषद व पोलिस विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह नागरी संरक्षण दल मुंबई येथून दोन पथके, एनडीआरएफची चार पथके १५० मनुष्यबळासह घटनास्थळी असून इतर विभागांचे अधिकारी कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य युवा मंडळे, ट्रेकर्स् ग्रुपचे प्रतिनिधी असे दुपारनंतर जवळपास ७०० जण मदत कार्यात सहभागी होते. पुणे येथून एनडीआरएफचे पथक पहाटे ४ वाजता घटनास्थळी पोहाचले होते. नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन दलाचे पथक, पनवेल नगरपालिका येथून ४४ अधिकारी कर्मचारी, २ जेसीबी पाठविण्यात आले तसेच ८ ॲम्बुलन्स, कर्जत येथून कळम, आंबिवली, मोहिल आदी प्राथमिक आरोग्यकेंद्राचे वैद्यकीय पथके घटनास्थळी पहाटेच पोहोचले होते.

मुख्यमंत्र्यांच्या आवाहनानंतर ३००० फूड पॅकेटस उपलब्ध करण्यात आले. यासह घटनास्थळावर पाणी बॉटल्स, ब्लँकेट्स, टॉर्च, मदत साहित्य, चादरी, बिस्कीट तसेच इतर प्रथम उपचार साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

बंद असणाऱ्या दिवा डम्पिंग ग्राउंडवर अनधिकृतरित्या कचरा टाकला जात असल्याचा ठाकरेंच्या शिवसेनेचा आरोप



दिवा:– डम्पिंग ग्राउंड बंद झाले असले तरी या डम्पिंग ग्राउंड वर अनधिकृत रित्या डंपरच्या माध्यमातून कचरा आणून टाकला जात असल्याचा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे.

भंडारली गावातील नागरिकांनी तेथील डम्पिंग ग्राउंडला तीव्र विरोध सुरू केल्यानंतर मागील काही दिवसांपासून दिवा येथे असणाऱ्या बंद डम्पिंग ग्राउंड वर अनधिकृत रित्या डंपरच्या माध्यमातून कचरा आणून टाकला जात असल्याचा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेचे पदाधिकारी अभिषेक ठाकूर यांनी पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांना पत्र लिहून केला आहे. पालिकेला दिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की,दिवा शहरातील बंद असणाऱ्या डम्पिंग ग्राउंड वर अनधिकृतरित्या कचरा टाकला जात आहे याकडे आपण लक्ष देऊन सदर प्रकार तातडीने बंद करावा असे अभिषेक ठाकूर यांनी म्हटले आहे.



दिव्यातील महिलांसाठी मनसे विभाग अध्यक्षा मयुरी तेजस पोरजी यांच्या कडून 'स्पेशल शो'चे आयोजन

डोंबिवली:– केदार जाधव निर्मित मराठी चित्रपट बाईपण भारी देवा या सिनेमाला महिलांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, सिनेमाच्या उत्कृष्ट कथानकामुळे चित्रपट सर्वांच्या पसंतीस उतरत आहे.



चित्रपटाला महिला प्रेक्षकांच्या मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मनसे विभाग अध्यक्षा सौ.मयुरी तेजस पोरजी यांनी दिव्यातील महिलांसाठी एका खास शोचे आयोजन एक्सपिरिया मॉल, पलावा, डोंबिवली येथे केले होते. या कार्यक्रमाला दिव्यातील महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी मनसे दिवा शहर अध्यक्ष तुषार भास्कर पाटील, शहर सचिव तेजस पोरजी, उपशहर अध्यक्ष मोतीराम दळवी, विभाग अध्यक्षा मयुरी पोरजी, विभाग सचिव संतोष पाटील, परेश पाटील, मनसे पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक कार्यक्रमाला उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २४ जुलै २०२३

ठाणे जिल्हा माहिती अधिकारी पदावर मनोज शिवाजी सानप रुजू

महाराष्ट्र शासन
जिल्हा माहिती कार्यालय ठाणे

ठाणे : ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा माहिती अधिकारी या पदावर मनोज शिवाजी सानप हे मंगळवार,१८ जुलै २०२३ रोजी रुजू झाले असून प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे यांच्याकडून त्यांनी आज पदभार स्वीकारला. सानप हे शासकीय सेवेत सन १९९९ पासून कार्यरत असून माहिती व जनसंपर्क विभागात ते २००६ पासून आजपर्यंत कार्यरत आहेत.त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई येथे लोकराज्य (वितरण), महान्यूज, वृत्त, आस्थापना, लेखा शाखा, अधिपरीक्षक पुस्तके व प्रकाशने या कार्यालयात अधिपरीक्षक या पदावर काम केले आहे. तद्नंतर त्यांनी जळगाव येथे माहिती अधिकारी या पदावर तर सांगली उस्मानाबाद, बीड, लातूर, रत्नागिरी व रायगड येथे जिल्हा माहिती अधिकारी पदावर शासकीय सेवा बजावली आहे. त्याचबरोबर सानप यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालय येथे सहसंचालक या पदावरही आपली शासकीय सेवा उत्कृष्टपणे बजावली आहे.

शासकीय कर्तव्याबरोबरच मनोज सानप यांना संचलन, अभिनय, सामाजिक कार्य, अवयवदान, ध्वजदिन जनजागृती, व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मुलाखत मार्गदर्शन आदि विषयांचा व्यासंग आहे.

मगरीच्या पिल्लाला घरी नेणे पडले महागात

वन्यजीवाची अवैध वाहतूक केल्याप्रकरणी मिळाली दोन दिवसांची कोठडी

ठाणे: काही दिवसांपूर्वी खेड येथे मासेमारीसाठी टाकलेल्या जाळ्यात मगरीची पिल्लू अडकले होते. त्या बेबी मगरीच्या पिल्लाला घरी आणून एका फिश टँकमध्ये ठेवणाऱ्या नवीमुंबईतील जेम्स जॉन पॉल याला ती गोष्ट चांगलीच महागात पडली आहे. या दुर्मिळ वन्यजीव मगरीच्या तस्करी प्रकरणी पॉल याला ठाणे वनविभागाने पकडल्यानंतर त्याच्यावर दोन दिवस पोलीस कोठडीत राहण्याची वेळ ओढवली आहे. ते बेबी मगर अवघी दीड महिन्यांचे असल्याची माहिती ठाणे वन विभागाने दिली.

नवीमुंबई, रबाळे येथील जेम्स जॉन पॉल यांच्या घरातील फिश टँकमध्ये बेबी मगरी असल्याची माहिती ठाणे वनविभागाला मिळाली होती.त्यानुसार १८ जुलै २०२३ रोजी वनविभागाने तपासणी केली. त्यावेळी ते पिल्लू मिळून आले. त्याच्या चौकशीत त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने वन गुन्हा घडला असल्याने मगर पिल्लु जप्त केले. तसेच त्याला ठाणे वनपरीक्षेत्र कार्यालयात आणण्यात आले.

तसेच मगर हे वन्यप्राणी वन संरक्षण अधिनियम १९७२ चे अनुसुचि मधील भाग २ मधील संरक्षीत वन्यप्राणी असुन मगर या वन्यप्राण्याची अवैधपणे वाहतुक झाल्याचे निदर्शनास आल्याने वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ कलम २,९,३९,४८,४९,५१ चा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांने गुन्हा कबुल केला असुन त्यांना न्यायालयात हजर करण्यात आल्यावर दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. ही कार्यवाही ठाणे उपवनसंरक्षक संतोष सस्ते, सहा. वनसंरक्षक (र.रा.प व वन्यजीव) सोनली यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे वनक्षेत्रपाल दिनेश देसले त्यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास ठाणे वनक्षेत्रपाल दिनेश देसले करीत आहेत.



मागील काही दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामध्ये दिवा शहरातील अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले

बैठया चाळीत पाणी साचल्याने नागरिकांचे झाले हाल

जिल्ह्यातील धरणाची पातळी पोहोचली ५० टक्क्यांवर

ठाणे: गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे तृष्णा भागविणारे ठाणे जिल्ह्यातील भातसा असो या तानसा किंवा बारवी व मध्य वैतरणा या धरणांची पातळी चांगली वाढली आहे. म्हणजे जवळपास ५० टक्क्यांहून अधिक झाली. यामध्ये तानसा या धरणाचा पाणी साठा हा ७७.९३ टक्के इतके झाला आहे. चार धरणांपैकी बारवी धरण क्षेत्रात जास्त पाऊस झाल्याने तब्बल १२.४६ टक्के पाणी साठ्यात वाढ झाली.

मागील तीन ते चार दिवसांपासून ठाणे,पालघर आणि रायगड या जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. या सातत्याने पडणाऱ्या पावसाने नद्यांच्या पातळ्यांनी धोक्याची पातळी गाठली. त्यामुळे नदी पत्राजवळी भागात पाणी शिरल्याने हजारो लोकांना स्थलांतरित करण्याची वेळ ओढवली होती. गेल्या दोन दिवसात पाण्याची पातळी कमी होऊ लागल्याने स्थलांतरित केलेले नागरिक आपआपल्या घरी परतले आहेत. त्यातच धरण क्षेत्रात ही पाऊस चांगला झाल्याचे धरण पातळीतील आजच्या टक्केवारी दिसत आहे. यामध्ये पालघर जिल्ह्यातील कवडास आणि वांद्री या धरणाचा तर मुंबईतील तुळशी तलाव याचा पाणीसाठा शंभर टक्के भरला आहे. तर, जिल्ह्यात गेल्या दिवसात पडलेल्या पावसणे अंबरनाथ तालुक्यातील बारवी धरणातील पाणीसाठा १२.४३ टक्क्यांनी वाढला आहे. तर भातसामध्ये ३.७२ टक्क्यांनी तर तानसामध्ये ९.८६ टक्क्यांनी तसेच मध्य वैतरणा मध्ये ३.६३ टक्क्यांनी वाढल्याचे जिल्हा प्रशासनाकडून दिलेल्या आकडेवारी स्पष्ट दिसत आहे. या वाढत्या पाणी साठ्याने ठाणेकर आणि मुंबईकर नागरिकांना दिलासा मिळाला आहे. जर असा पाऊस पडत राहिला तर लवकरच या धरणाचा पाणीसाठा शंभर टक्के झाल्याशिवाय राहणार नाही.

ठाणे आणि मुंबईकरांना दिलासा

खड्ड्यांमुळे जर बळी गेला तर ठेकेदार व इंजिनियर यांना जबाबदार धरून गुन्हे दाखल करा

– खासदार राजन विचारे

ठाणे : नुकताच ठाणे महानगरपालिकेने ठाणे महापालिका क्षेत्रात रस्त्यांची कामे सुरु केली असून निकृष्ट दर्जाच्या केलेल्या कामामुळे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. या खड्ड्यांमुळे जर कोणाचा बळी गेला तर ठेकेदार व इंजिनियर यांना जबाबदार धरून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आलेली आहे. तसेच या पत्रामध्ये ठाणे महापालिका हद्दीतून जाणाऱ्या हायवे पूर्व द्रुतगती महामार्गावरील उड्डाणपूल आणि उड्डाणपुलाखालील काही रस्ते एमएम आर डी ए, काही एम एस आर डी सी तर काही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अशा वेगवेगळ्या यंत्रणांकडे त्यांची दुरुस्तीची कामे असल्यामुळे प्रत्येक विभाग एकमेकांकडे चालढकल करीत आहे. त्यामुळे याची तक्रार कोणाकडे करायची असा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे.

मध्यंतरी आपण आयुक्त म्हणून आपल्या अभियंताना सूचना केल्या होत्या कि, रस्ता कोणाचा ही असो खड्डा पडला कि बुजवून टाका. परंतु सूचनेचे पालन अधिकारी अद्याप करताना दिसत नाही. त्यामुळे नागरिकांना खड्डे चुकवून प्रवास करताना दमछाक करावी लागते. त्यामुळे आपण तत्काळ सर्व अभियांतांना सतर्क राहण्याच्या सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात अशी सूचना खासदार राजन विचारे यांनी ठामपा आयुक्त आपल्या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

नियमित प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र...
लवकरच 3 ऱ्या वर्षात पदार्पण करत आहे...
दिवा न्यूज
लवकरच नव्या स्वरूपात...

एक रुपयात पिक विमा योजनेत ३१ जुलैपर्यंत अर्ज भरून शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे

– जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

ठाणे: शेतकऱ्यांच्या उत्पादनाला नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे, यासाठी राज्य शासनाने एक रुपयात सर्वसामावेश पिक विमा देणार आहे. या पिक विम्यासाठी ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी अर्ज करावा,असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान समितीची बैठक झाली. त्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी पिक विमा योजनेत जिल्ह्यातील १०० टक्के शेतकऱ्यांचा सहभाग असावा, यासाठी कृषि विभाग, विमा कंपन्या व महसूल प्रशासनाने प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दीपक कुटे, आत्माचे प्रकल्प संचालक विनायक पवार, जिल्हा परिषदेच्या कृषि अधिकारी सारिका शेलार, उत्तर कोकण विभागाचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रविंद्र मर्दाने, युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीचे उपमहाव्यवस्थापक जयदीप सिन्हा यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रधानमंत्री पिक विमा योजना, पुर्नरचित हवामानावर आधारित फळ पिक विमा योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, कृषी पायाभूत सुविधा योजना, कृषि यांत्रिकीकरण योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, एकात्मिक फलोत्पादन अभियान, अन्न व पोषण सुरक्षा योजना या योजनांचा आढावा यावेळी घेण्यात आला. जिल्हास्तरीय आत्मा नियामक मंडळाची यावेळी बैठक झाली.

जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतमालाचे नुकसान सोसावे लागते. हे नुकसान कमी करण्यासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू केली आहे. या योजनेत सुधारणा करून राज्य शासनाने एक रुपयात सर्वसमावेशक पिक विमा योजना यंदापासून राबविण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील सर्व खातेदार व बिगर खातेदार तसेच कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांच्या पिकाचा विमा काढण्यात यावा. यासाठी कृषि विभाग, संबंधित विमा कंपनी, महसूल प्रशासनातील तलाठी, ग्रामसेवकांनी मिशन मोडवर मोहिम आखावी. जिल्ह्यातील एकही शेतकरी पिक विम्यापासून वंचित राहू नये, याची काळजी घेण्यात यावी. शेतकऱ्यांनी केवळ एक रुपया भरून तातडीने पिक विमा योजनेत सहभागी व्हावे. असे म्हटले.

यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कुटे यांनी विविध योजनांच्या सद्यःस्थितीची माहिती दिली.

यावेळी पिक विमा योजनेची माहिती देणाऱ्या घडीपत्रिका तसेच चित्ररथाचे अनावरण जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या हस्ते झाले.

महाज्योतीच्या प्रवेश परीक्षा गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी सुरू

ठाणे : महाज्योती मार्फत यूपीएससी पूर्व प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेतील गैरव्यवहाराची नियमानुसार चौकशी सुरू केली आहे. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अहवाल मागविला असून परीक्षे दरम्यान गैरव्यवहार करणाऱ्या विद्यार्थ्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महाज्योतीतर्फे प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

महाज्योतीच्या वतीने यूपीएससी पूर्व प्रशिक्षणासाठी १६ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात प्रवेश परीक्षा घेण्यात आली. महाज्योती मार्फत विविध प्रशिक्षणाच्या प्रवेशासाठी परीक्षा घेण्यासाठी एजन्सी निवडण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. निविदा प्रक्रियेतून परीक्षा घेणारी एजन्सी नियुक्त करण्यात आली. त्या एजन्सी मार्फत महाज्योती करीता यूपीएससी पूर्व प्रशिक्षणाच्या प्रवेशासाठी परीक्षा आयोजित केलेली होती. या परीक्षेसाठी २० हजार २१८ उमेदवार पात्र होते त्यातील १३ हजार १८४ उमेदवारांनी महाराष्ट्रातील १०२ परीक्षा केंद्रांवर तर दिल्ली येथील २ परीक्षा केंद्रावर परीक्षा दिली. परीक्षा झाल्यावर काही परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांनी गैरप्रकार केल्याच्या तक्रारी महाज्योती कार्यालयास प्राप्त झाल्या. त्या तक्रारीच्या अनुषंगाने महाज्योती कार्यालयाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे. चौकशी अधिकारी यांनी परीक्षा घेणाऱ्या एजन्सीला सदर प्रकरणात फुटेज तपासून गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अहवाल मागविला आहे. अशा प्रकारे त्या प्रकरणाची चौकशी महाज्योतीने सुरु केलेली आहे. परीक्षे दरम्यान गैरव्यवहार करणाऱ्या विद्यार्थ्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे महाज्योतीच्या परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी मनात कोणताही संभ्रम ठेवू नये तसेच कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन महाज्योतीमार्फत करण्यात आले आहे.

'कोमसाप'चे जिल्हा साहित्य संमेलन येत्या ३० जुलै रोजी ठाण्यात रंगणार!

ठाणे : कोकण मराठी साहित्य परिषद अर्थात 'कोमसाप'चे जिल्हा साहित्य संमेलन यंदा रविवार, ३० जुलै २०२३ रोजी ठाणे येथील आनंद विश्व गुरूकुल विधी महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे. कोकण मराठी साहित्य परिषद, आनंद विश्व गुरूकुल, शारदा एज्युकेशन ट्रस्ट, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात परिसंवाद, कवी संमेलन, अभिवाचन आदी सत्रांतून ठाणेकरांना साहित्यिक मेजवानी मिळणार आहे.

कोकण मराठी साहित्य परिषद गेल्या तीन दशकांपासून मराठी भाषा आणि साहित्याच्या प्रचार-प्रसारासाठी कार्यरत आहे. कोमसापकडून दरवर्षी भरवण्यात येणारे जिल्हा साहित्य संमेलन यंदा ठाणे येथील आनंद विश्व गुरूकुल विधी महाविद्यालयात सकाळी ९.३० ते सायंकाळी ७ या वेळेत संपन्न होणार आहे. साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कादंबरीकार राजन गवस हे या संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषवणार असून संमेलनाचे स्वागताध्यक्ष अंबरनाथचे माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी असणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक व कोमसापचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांची या संमेलनाला प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याबाबत कोमसापचे ठाणे जिल्हाध्यक्ष बाळ कांदळकर यांनी सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.

या साहित्य संमेलनातून आजचे साहित्य संवेदन टिपणारी आणि लिहित्या हातांना अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी सत्रे होणार आहेत. या पत्रकार परिषदेस शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठुसे, कोमसापचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, स्वागताध्यक्ष सुनील चौधरी, जिल्हाध्यक्ष बाळ कांदळकर यांच्यासह कोमसापचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

अतिवृष्टीदरम्यान सर्व यंत्रणांनी सज्ज रहावे

आयुक्त अभिजीत बांगर

पाणी साचणाऱ्या ठिकाणांची आयुक्तांनी केली पाहणी

ठाणे : गेल्या दोन दिवसापासून ठाणे शहरात पावसाची संततधार सुरू असून अतिवृष्टीदरम्यान नागरिकांची गैरसोय होवू नये यासाठी शहरातील पाणी साचण्याची जी ठिकाणे आहेत त्या ठिकाणी पाण्याचा निचरा लवकर होईल या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यातच २८ व २९ जून रोजी अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जी निरीक्षणे होती, त्यानुसार शहरातील काही भागात उदा. चिखलवाडी, वंदना सिनेमागृह, पेढ्या मारुती आदी ठिकाणी आवश्यक उपाययोजना करणेबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या होत्या. सदर उपाययोजनामुळे या ठिकाणी पाणी साचण्याच्या स्थितीत काही बदल झाला आहे का? याची देखील पाहणी केली.

२८ जून रोजी २०० मि.मी पाऊस झाला होता, तुलनेत १९ जुलै रोजी देखील तितक्याच प्रमाणात पावसाची नोंद झाली आहे व हा या पावसाळ्यातील दुसरा दिवस होता म्हणजेच या दोन्ही दिवशी पावसाची तीव्रता अधिक होती. विशेष करुन १९ जुलैच्या रात्री पावसाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार व भरतीच्या वेळेची नोंद ठेवून अतिवृष्टीच्या काळात सर्व यंत्रणा कृतीशील राहतील याचीही दक्षता घ्यावी अशा सूचना आयुक्त बांगर यांनी बैठकीत दिल्या.

पावसामुळे डोंगर उतारावरुन येणाऱ्या पाण्याबरोबरच दगड– माती वाहून ती रस्त्यावर येते. तसेच काही ठिकाणी डांबरी रस्त्यावर मातीसदृश्य कचरा दीर्घकाळ पडून राहिल्यामुळे रस्ता खराव होण्यास सुरूवात होते. त्यामुळे रस्ता साफसफाईवर कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे. मागील दोन दिवस झालेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर येत्या २१ जुलैपासून हवामान खात्याने ऑरेंज ॲलर्ट कमी करुन यलो ॲलर्ट जाहीर केला असल्यामुळे जास्तीच्या पावसाची शक्यता कमी आहे. यावेळी रस्ते साफसफाईकडे जास्त लक्ष केंद्रीत करावे. तसेच दोन दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी रस्त्याची परिस्थिती खराब झाली असेल तर त्यासाठी देखील प्रत्यक्ष जागेवर आवश्यक यंत्रणा उपलब्ध करुन मास्टकि तंत्रज्ञानाद्वारे रस्त्याची डागडुजी केली जाईल याची निश्चिती करण्याच्या सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

अतिवृष्टीच्या काळामध्ये लो– लाईन एरिया जिथे घरांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता आहे अशी ठिकाणे शोधून अशा ठिकाणच्या कुटुंबांना स्थलांतरीत करण्याची गरज असेल तर त्यासाठी प्रभागसमितीनिहाय निश्चित केलेल्या शाळा व समाजमंदिरे येथे वेळीच स्थलांतर करण्याबाबतही आयुक्त बांगर यांनी सूचित केले.

दरम्यान बुधवारी झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी आज शहरातील काही भागांची पाहणी केली. ठाण्यातील गुन्हे अन्वेषण विभाग परिसरात पाणी साचत असल्याने सदर ठिकाणी लावण्यात आलेले पंप हे पावसाळी गटारांना जोडण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच गुन्हे अन्वेषण विभागाचे कार्यालय सखल भागात असल्यामुळे तेथे पाणी साचण्याची शक्यता वाढते, हे पाहता त्या कार्यालयाची पुर्नबांधणी करताना बांधकामाचा जोता रस्त्याच्या वर राहील याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या.

तसेच कळव्यातील सह्याद्री परिसरातील नाल्याची पाहणी केली असता सदर नाला रस्त्याच्या खाली ज्या कलव्हर्ट मधून जातो त्या कलव्हर्टची उंची कमी असल्यामुळे अतिवृष्टी व भरतीच्या वेळी पाण्याचा फुगवटा होवून नाल्यातील पाणी रस्त्यावर येते व परिसरामध्ये पाणी साचते. सध्या पंपाच्या माध्यमातून या परिस्थितीवर काही मार्ग निघू शकतो का हे पडताळून पाहण्याच्या सूचना यावेळी आयुक्तांनी केल्या. तद्नंतर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून या रस्त्यांची पुर्नबांधणी करुन रस्त्याखालील कलव्हर्टची उंची वाढवावी जेणेकरुन पाण्याचा निचरा हा अधिक चांगल्या पध्दतीने होवू शकेल. यापूर्वी के.व्हिला येथील पुलाखालील पाणी बाजूच्या सोसायटीत शिरत होते, मात्र तेथील कलव्हर्टची रुंदी वाढविल्यामुळे या नाल्यातील पाणी रस्तयावर येण्याची शक्यता कमी झाली आहे, याच धर्तीवर सह्याद्री येथील नाल्याबाबत देखील उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

तसेच विटावा सब–वे येथे रेल्वे पुलाखाली पंप बसविण्यात आले असल्यामुळे या ठिकाणी पाण्याचा निचरा योग्यपध्दतीने होत असला तरी अतिवृष्टीच्या काळात या ठिकाणी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध राहिल व वापरण्यात येणारे पंप सुस्थितीत असतील याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना देखील संबंधितांना दिल्या आहेत. विटावा सब– वे कडे येणाऱ्या नाल्यालगत रेल्वेने भराव टाकल्यामुळे अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे मागील पावसाळ्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचत होते. यावर्षी पावसाळापूर्व कामांमध्ये सदर भराव हटवून या ठिकाणी पाईप लाईन टाकल्यामुळे पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होवून सब–वे मध्ये पाणी साचण्याची शक्यता कमी झाली आहे.

सिडको बसस्टॉप येथील रेल्वे बोगद्यामध्ये भरतीच्यावेळी पावसाचे पाणी साचत असून सद्यस्थितीत या ठिकाणी पंप बसविण्यात आले आहे. तरी देखील रस्त्यावरील पाण्याचा संपूर्णपणे निचरा वेळोवेळी व्हावा यासाठी रस्त्याच्या बाजूला खड्डा तयार करुन त्यामधून पाणी उचलण्याची उपाययोजना करावी, यामध्ये रस्त्याच्या लेवलपेक्षा खालून पाणी उचलले तर रस्त्याच्या लेवलला पाणी येण्यापूर्वी त्याचा निचरा करणे शक्य होईल व वाहतुकीला कुठलाही प्रतिरोध होणार नाही या दृष्टीने तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही आयुक्त बांगर यांनी या पाहणी दौऱ्या दरम्यान दिल्या. यावेळी उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, शंकर पाटोळे यांच्यासह संबंधित प्रभागसमितीचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, २४ जुलै २०२३

कैलेश पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दिवा शहर शिवसेना उपविभाग प्रमुख व सामाजिक कार्यकर्ते कैलेश मनोहर पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विभागातील कार्यकर्त्यांनी कैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती. त्यांच्या वाढदिवसानिमित्त ची काही क्षणचित्रे!

खडावली अपघातातील जखमींची केली दादा भुसे यांनी विचारपूस

ठाणे: भिवंडी तालुक्यातील मौजे पडघा खडावली फाट्याजवळ मंगळवारी सकाळी झालेल्या अपघातातील तीन जखमींना भिवंडीतील मायरा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल जाऊन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांनी त्या जखमींची विचारपूस केली व त्यांच्या नातेवाईकांना दिलासा दिला. सकाळी पडघा येथील खडावली फाट्याजवळ कंटेनर व काळी पिवळी जीप या वाहनांमध्ये पडघा वरुन खडावली रेल्वे स्टेशनला जात असताना भीषण अपघात झाला. त्यामध्ये सहा जण मयत झाले असून पाच जण जखमी झाले आहेत. यातील तीन जखमींना भिवंडी येथील मायरा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. दिलीप सरोज (वय २९), चेतना गणेश जारे (वय १९), कुणाल ज्ञानेश्वर भामरे (वय २२) या जखमींची भुसे यांनी रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. यावेळी पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने, ठाणे शहर वाहतूक शाखेचे उपायुक्त विनयकुमार राठोड, तहसीलदार अधिक पाटील आदी उपस्थित होते.

ठाण्यातील डोंगराळ भागातल्या वसाहतींचे पुनर्वसन करण्याचे नियोजन करा –खासदार विचारे

ठाणे: महाराष्ट्रामध्ये दरवर्षी पावसाळ्यात डोंगर भागामध्ये दरड कोसळल्याच्या घटना घडत आहेत. त्यामध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागते. यावर्षीही खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी वर दरड कोसळल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहे. ठाण्यामध्ये सुद्धा काही डोंगराळ भागात अनेक वसाहती ४० ते ५० वर्षापासून अधिक काळ वास्तव्यास आहेत. त्यामुळे या डोंगराळ भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने खासदार राजन विचारे यांनी याची दखल घेऊन अशी घटना आपल्याकडे घडू नये यासाठी ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना पत्र देवून निवेदन दिले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी ठाणे शहराला लाभलेला डोंगराळ भाग लक्षात घेऊन या वसाहतींच्या खालील परिसरात नव्याने इमारत उभी करून त्याठिकाणी त्यांच्या हक्काच्या घरात पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न करावे व याचा नियोजनबद्ध आराखडा तयार करावा अशी मागणी त्यांनी या पत्रामध्ये केलेली आहे.

ठाण्यात महिला कॉँग्रेसचे आंदोलन

ठाणे : मणिपुर येथे घडलेल्या घटनेचे पडसाद आता ठाण्यातही उमटण्यास सुरवात झाली आहे. शनिवारी महाराष्ट्र प्रदेश महिला कॉँग्रेसने या घटनेचा निषेध करीत, या प्रकरणातील आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. तसेच मणिपुर सरकारने पायउतार व्हावे अशी मागणी करीत महिलांनी आपले केस कापून या घटनेचा निषेध केला. पोलिसांनी यावेळी आंदोलनकर्त्या पदाधिकारी महिलांना ताब्यात घेतले.

महाराष्ट्र प्रदेश महिला कॉँग्रेसच्या सचिव शिल्पा सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली घोडबंदर रोड मानपाडा उड्डाणपूल येथे हे आंदोलन करण्यात आले. यावेळी मणिपुर मध्ये घडलेल्या घटनेचा यावेळी निषेध करण्यात आला. तसेच मोदी सरकार शर्म करो, मोदी सरकार हाय हाय असा घोषणाही यावेळी देण्यात आल्या. महिलांवर वारंवार होणाऱ्या अशा अत्याचाराच्या घटना कधी बंद होणार असा सवालही यावेळी करण्यात आला.